# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.03.2025** **वार:शुक्रवार**

1. धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी 20 हजार रुपये निधी देण्याचा राज्य सरकारचा निर्णय.
2. 2024 या वर्षासाठीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना जाहीर.
3. महाड परिसरात भीमसृष्टी उभारणार-सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची घोषणा आणि
4. दिव्यांगांच्या खेलो इंडिया स्पर्धांना नवी दिल्लीत प्रारंभ; तर कबड्डी विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघाचा दबदबा कायम.

**विधानसभा**

राज्यातल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी 20 हजार रुपये निधी देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. जास्तीत जास्त 2 हेक्टरसाठी हा निधी दिला जाईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत केली. शेतकरी कर्जमाफी संदर्भात माहिती गोळा करायचं काम सुरू आहे, असंही ते म्हणाले. आर्थिक परिस्थिती पाहून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवण्याचा निर्णय घेऊ याचा पुनरुच्चार त्यांनी केला. अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान काही सदस्यांनी तरतुदीच्या तुलनेत अतिशय कमी खर्च झाल्याचा आरोप अजित पवार यांनी फेटाळून लावला ते म्हणाले.....

***त्या दोन निवडणुकीमध्ये नाही म्हटलं तर दोन दोन महिन्याच्या आचारसंहिता धरली तर चार महिने त्याच्यामध्ये ही यंत्रणा त्या कामामध्ये गुंतून जाते, तरी देखील आत्ताच्या घडीला खर्च जो काही 5 लाख 35 हजार 208 कोटी इतका खर्च झालेला आहे आणि मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीच्या जवळपास आता साडे सत्याहत्तर टक्के आहे अजूनही काही दिवस बाकी आहेत त्याच्यामध्ये पण तो खर्च वाढेल.***

महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्यासंदर्भातील विधेयक अर्थमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत सादर केलं.

अर्थसंकल्पातल्या वित्त, उद्योग, ऊर्जा, कामगार, खनिकर्म, ग्रामविकास, अन्न, नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण आणि नियोजन विभागाच्या अनुदानाच्या मागण्या काल विधानसभेत मंजूर करण्यात आला.

**राज्य अधिवेशन**

विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषद सभापती सत्ताधारी पक्षाला साथ देऊन नियमबाह्य पद्धतीने कामकाज करत असल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. या संदर्भात विरोधी पक्षाच्या आमदारांनी राजभवनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिलं.

दिशा सॅलियन मृत्यू प्रकरणी नव्याने चौकशी करावी अशी मागणी भाजपाचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी काल विधानपरिषदेत केली. मात्र सत्ताधारी याप्रकरणाचा वापर राजकीय हेतूसाठी करत असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे.

**महाराष्ट्र भूषण**

2024 या वर्षासाठीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत केली. 25 लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह, शाल असं या पुरस्काराचे स्वरूप आहे. 100 वर्ष वयाचे राम सुतार यांनी देशातील अनेक महत्वाचे पुतळे बनवले आहेत. इंदू मिल इथल्या स्मारकातला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, सिंधुदुर्ग इथला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्याचे काम त्यांच्याकडून सुरू आहे. राम सुतार यांचा जाहीर झालेला हा पुरस्कार म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहास, कला, सांस्कृतिक क्षेत्राचा गौरव असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. तर हा पुरस्कार जाहीर झाल्याने पुरस्काराची प्रतिष्ठा उंचावली आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राम सुतार यांचे अभिनंदन केलं.

**सूक्ष्मान्न-सांगली**

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेत सांगली जिल्ह्याने देशात दुसरा आणि राज्यात प्रथम क्रमांकावर असल्याची माहीती जिल्हा नोडल अधिकारी धनाजी पाटील यांनी दिली आहे. या योजनेंतर्गत 2024-25 या आर्थिक वर्षात 538 लाभार्थींच्या प्रक्रिया उद्योगांना मंजुरी मिळाली असून 12 कोटी 67 लाख रुपयांचं अनुदान मंजूर करण्यात आलं आहे. याबाबत अधिक माहिती देताना धनाजी पाटील म्हणाले....

***ही योजना चालू केल्यापासून जवळजवळ साडेतीन ते चार हजार नवीन लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. काही लोकं स्वयंरोजगार निर्मिती केलेली आहे. सदर उद्योग जगामध्ये कृषीचा जो माल आहे, कच्चा माल निर्माण होतो, द्राक्ष असतील, हळद असेल, बेदाणा असेल किंवा बेकरीचे पदार्थ असतील किंवा मसाल्याचे पदार्थ असतील चांगली जिल्ह्यामध्ये. वर छोटेमोठे प्रक्रिया उद्योग निर्माण झालेले आहेत. आणि या प्रक्रिया उद्योगामुळं जो शेतमालाची नासाडी व्हायची किंवा पोस्ट हार्वेस्ट मध्ये लॉसेस व्हायचे त्याच्यामध्ये डस्टिकली कमी झालेले आहेत लॉसेस आणि काही ब्रांड्स हे तयार झालेले आहेत ते देश पातळीवर गेलेले आहेत, राज्य पातळीवर गेलेले आहेत. आणि या ब्रॅंड मुळं जिल्ह्याला एक नवीन ओळख निर्माण झालेली आहे.***

**चिमणी दिवस**

प्रत्येकाच्या आयुष्यात प्रथम ओळख झालेला पक्षी म्हणजे चिमणी. संपूर्ण लहानपण चिमणीमय झालेलं प्रत्येकाने अनुभवलेलं असतं. काळाच्या ओघात चिऊताई आपल्यापासून दूर गेली होती. मात्र आता चित्र बदलत असून चिमण्यांची संख्या वाढण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न होताना दिसत आहेत. काल साजऱ्या करण्यात आलेल्या जागतिक चिमणी दिवसानिमित्त राज्यत विविध उपक्रम राबवण्यात आले. त्याबाबत आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी पाठवलेल्या माहितीवर आधारित हा वृत्तांत.....

आपल्या अंगणातून हरवलेली चिमणी पुन्हा अंगणात कशी आणता येईल, तिच्या संख्येत वाढ होण्यासाठी पाणी आणि घरट्याची सोय मोठ्या प्रमाणात केली जात आहे. पुण्यातील नवीन मराठी शाळेमधील पहिली ते चौथीतील 300 विद्यार्थ्यांनी चिमणीची चित्रे रेखाटून चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी उभारण्याचा तसेच त्यांच्यासाठी एक घास आणि पाणी देण्याची शपथ घेतली.

मुंबईत वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यानात 'इंडियन स्पॅरोमॅन'म्हणून ओळख असलेले मोहम्मद दिलावर यांनी उपस्थितांना चिमणीच्या संवर्धनाबाबत मार्गदर्शन केलं.

सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथील पक्षी मित्र आष्पाक आत्तार हे अनेक वर्षांपासून चिमण्यांसाठी घरटी बनवतात, अन्नपाण्याची व्यवस्था करतात. त्यामुळे चिवचिवाट आणि किलबिलाटाने परिसर सतत गजबजलेला असतो. आपल्या कार्याबाबत अधिक माहिती देताना ते आकाशवाणीशी बोलताना म्हणाले.....

***निसर्गाच्या अन्नसाखळीमध्ये पक्ष्यांचं वेगळं असं महत्त्व आहे. मात्र वाढतं शहरीकरण, आधुनिकीकरण यामुळं हे पक्षी नामशेष होऊ लागले आहेत. त्यांचं संवर्धन करणं काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्याही हे लक्षात यावं जनजागृती व्हावी या उद्देशाने आम्ही आमच्या इस्लामपूरच्या सद्गुरु आश्रमशाळेमध्ये पक्ष्यांसाठी घरटी बनवण्याचा उपक्रम घेतला. अनेक विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून आकर्षक अशी घरटी बनवली. चिवचिव चिमणी पर्यावरण रक्षिणी आओ आज आदमी से फरिश्ते बजाए एक पक्षी की जान बचाए, सेव बर्ड्स असे अनेक स्लोगन लिहून विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त या उपक्रमात सहभाग घेत चिमण्यांसह पक्षी वाचवण्याचा संदेश दिला.***

***बुलढाणा जिल्ह्यात पक्षी मित्र संजय गुरव यांनी सुरू केलेल्या उपक्रमाला सर्वसामान्यांची सोबत मिळत असल्याने चिमण्यांच्या संख्येत झाली वाढ होत असल्याचं सांगितलं. याबाबत आकाशवाणीशी बोलताना ते म्हणाले.....***

***चिवताई घरकुल योजनेच्या माध्यमातून चिमण्यांच्या संख्येमध्ये जी वाढ झाली ती आज आम्हाला पाहायला मिळत आहे. म्हणजे आमच्या बालपणी जी कविता आम्हाला आमची आई मावशी, आजी म्हणायची चिव ये दाना खा पाणी पी आणि भूर उडून जा ती आज प्रत्यक्ष उतरत आहेत प्रत्येकाने आपल्या घराच्या भिंतीवर पक्षी घरटे चिमणी घरटे लावावी.***

***सिमेंटच्या जंगलात आपले कुटुंब वाढवण्यासाठी चिऊताईला गरज आहे तिला तिचा अधिवास देण्याची. आपले घर बांधताना तिच्यासाठी एक खोपा, एक घरटं तयार करण्याची. ते झालं तर आपल्या बालपणातील चिमणी पुन्हा आपल्या आंगणात येईल. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी प्रशांत जाधव पुणे.***

**<u>चवदार तळे-रायगड</u>**

रायगड मधल्या महाडमध्ये चवदार तळे सत्याग्रहाचा 98वा वर्धापन दिन काल उत्साहात पार पडला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासमोर रायगड पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात आली तसच हेलिकॉप्टर मधून चवदार तळे परिसरावर पुष्पवृष्टी करण्यात आली. या परिसरात भीमसृष्टीची निर्मिती करण्याची घोषणा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी यावेळी केली.

**नाथषष्ठी-औरंगाबाद**

पैठण इथं संत एकनाथ महाराजांच्या नाथषष्ठी सोहळ्याला काल सुरुवात झाली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते नाथसमाधीची सपत्निक विधीवत पूजा करण्यात आली. या यात्रौत्सवासाठी यंदा 627 पायी दिंड्या पैठण इथं दाखल झाल्या आहेत. पैठण नगर परिषदेच्या वतीनं वारकऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

**नागपूर दंगल-मुंबई**

नागपूर दंगलींचा सूत्रधार फहीम खान याच्यासह 6 जणांविरोधात राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी विविध समाजमाध्यमांवर प्रक्षोभक मजकूर आढळला असं सायबर सेलचे उपायुक्त लोहित मतानी यांनी काल वार्ताहर परिषदेत सांगितलं.

**भूजल**

भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेच्या माध्यमातून या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारी गावं तयार झाली असून ही कामं सुरू राहण्यासाठी गावातील सर्वांनी एकत्रितपणे काम करावं असं आवाहन भूजल आयुक्त डॉक्टर विजय पाखमोडे यांनी केलं आहे. अटल भूजल योजनेच्या अनुषंगाने आयोजित कार्यशाळेत ते काल पुण्यात बोलत होते.

**पॅरागेम्स**

खेलो इंडिया पॅरा गेम्सच्या दुसऱ्या पर्वाचं उद्घाटन केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांच्या हस्ते काल नवी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये झालं. महाराष्ट्राच्या सुकांत कदम याने उद्घाटनाचा दिवस गाजवला. त्याने पॅरा बॅडमिंटनमध्ये एस एल 4 गटात महाराष्ट्राच्याच निलेश गायकवाडचा 21-10, 21-19 सेटने पराभव करत उपांत्यपूर्व फेरी गाठली. व्हीलचेअरच्या डब्ल्यू एच 1 गटात महाराष्ट्राच्या प्रेमकुमार अले यानेही उपांत्यपूर्व फेरीतील आपलं स्थान पक्क केलं.

**कबड्डी**

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या कबड्डी विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष संघाने काल वेल्सचा 102-47 असा पराभव केला. या विजयासह भारतीय संघाने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. भारतीय पुरुष संघाचा उपांत्यपूर्व आणि महिला संघाचा उपांत्य फेरीतील सामना आज होणार आहेत.

**हवामान**

येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**या बरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**